# गजल आणि गायकी : एक प्रश्नोत्तरी

## अशोक दामोदर रानडे

(मूळ प्रसिद्धी - महाराष्ट्र साहित्य पत्रिका, संपा. वसंत स. जोशी, महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे, दिवाळी १९८६)

(हा लेख लेखकांनी प्रश्नोत्तराच्या स्वरूपात लिहिला आहे. लेखकांनीच प्रश्न उपस्थित करून त्यांची उत्तरे दिलेली आहेत- संपादक)

**: *गजलाची पार्श्वभूमी काय?***

गजलाचा प्रभावी पायरव मराठीत मोरोपंतांनी केला इत्यादी गोष्टी गायकीच्या संदर्भात गजाली होत. तेव्हा प्रश्न जरा फिरवून घेतो. आजकाल गजल लोकप्रिय झाला आहे. एखादा प्रकार प्रभावी झाला असल्याच्या खुणा दोन प्रकारच्या असतात. नवीन कलाकार आग्रहाने त्याच्या मागे लागतात किंवा काही कलाकार आग्रहाने तो टाळू लागतात! दोन्ही आग्रह वस्तुतः पसंतीची पावती होत. गायनप्रकार म्हणून होत असलेली भरभराट ही आजच्या गजल विचाराची पार्श्वभूमी होय.

**: *खुद्द गजलाची स्वत:ची म्हणून जी पार्श्वभूमी असेल त्यातच त्याच्या आजच्या लोकप्रियतेची बीजे नाहीत काय?***

कोणत्याही वर्तमान परिस्थितीला भूतकालीन परिस्थिती कारणीभूत असते हे तत्त्व मान्य आहे. पण प्रयोगकलांमधील घटनांचा मागोवा घेताना 'अधुना प्रसिद्धा'कडून 'पूर्वा'कडे जाणे बरे असते. विशेषतः जनसंगीताबाबत तर आजचा संदर्भ नेहमीच अधिक महत्त्वाचा असतो (आणि गजल हा जनसंगीत प्रकार आहे.) अनेक सांस्कृतिक-सामाजिक (- यातच सांगीतिक - आर्थिक बाबींचाही समावेश झाला -) कारणांमुळे कोणत्यातरी ताबडतोबीच्या गरजा पुऱ्या करण्यासाठी जनसंगीताचा अवतार होत असतो. म्हणूनच पार्श्वभूमी ही संज्ञा वापरताच व्युत्पत्ती, प्राचीन काळ, ग्रांथिक पुरावा वगैरे साहित्यांगी संशोधनाचे मोह खुणावू लागतात याचे भान ठेवावे. 'आज' व 'प्रयोग' ही चर्चेची पालुपदे असावीत!

**: *असो. तुमचे प्रतिपादन मान्य केल्यास विचार कसा सुरू करावा असे वाटते ?***

पहिला मुद्दा असा की गजलगायन गायकांचा कंठमणी होण्याची सर्व कारणे सांगीतिक- साहित्यिक नाहीत याची नोंद घ्यावी.

दुसरा मुद्दा असा की गजलगायन लोकप्रिय झाले आहे ते नगरात आणि खास करून महानगरात याची जाणीव ठेवावी. शिवाय महानगर संस्कृतीचा जो एक 'देशकालनिरपेक्ष' म्हणजे पंचतारांकित विश्रामस्थांनाच्या अंगाने वाढणारा स्तर गजलाला पाठिंबा देतो आहे तोही ध्यानात घ्यावा.

माझे म्हणणे थोडे स्पष्ट करतो. गायनाला आश्रय देणारा वर्ग आता अधिकाधिक सरमिसळ होतो आहे. या वर्गाला कोणते आविष्कार हवेसे वाटतात? त्याला ज्यांत भाग घेता येईल असे. शास्त्रोक्त संगीतात वगैरे भाग घेण्याची क्रिया कष्टसाध्य असते! वाहवा देण्याच्या जागांचे दिग्दर्शन ज्यात अंगभूत असते असे प्रकार अर्थातच लोकप्रिय होणार... क्रिकेटच्या सामन्याला जाणे, व्हिडिओवर घरी चित्रपट पाहणे आणि गजल ऐकणे यामागची अनेकांची भूक एकच असते म्हणण्यांत अतिशयोक्ती नाही!

गजलाचे रचनातत्त्वच असे आहे की त्यात शिरकाव करून घेण्यासाठी ऐकणाऱ्याला पदोपदी जागा आढळतात. लोकप्रियतेच्या या कारणांना काही सांगीतिक म्हणता यायचे नाही हे उघड आहे. पण संगीताविष्कारांचा स्वीकारास्वीकार केवळ सांगीतिक कारणांवर अवलंबून असतो हा गैरसमज आहे. अनेकदा (विशेषतः जनसंगीताबाबत) संगीत आणि संगीतबाह्य घटना यांचे विरोधविकासपूर्ण नाते जुळते आणि यातूनच जनसंगीत प्रकार आपापले खास रूप धारण करतात. असो.

दुसरी महत्त्वाची बाब अशी की गजल आणि त्याची गायकी आज सुटेपणे लोकप्रिय झालेली नाही. सध्या भक्तिसंगीताचे आविष्कारही बरेच भरभराटीस आले आहेत! बारकाईने पाहता दोहोंच्या पकडीमागच्या प्रेरणा समान...

***: परंपरेनुसार गजल हेही भक्तिसंगीत नव्हे काय ? आजही...***

: जऽऽरा थांबा. त्याकडे नंतर वळू. तो मार्ग जरूरीपेक्षा लवकरच चर्चा साहित्याच्या प्रांतात पोचवील!

एकंदरीने सरमिसळ समाज, स्वातंत्र्योत्तर काळातली नवसाक्षरांची वाढती संख्या, सार्थ आणि गुणगुणाव्याशा वाटणाऱ्या चित्रपटगीतांची १९५० नंतर ओसरू लागलेली लाट अशा एकंदर चौकटीत सहज समजतील आणि तरीही निरर्थक नसतील अशी गीते हवीहवीशी वाटू लागली. गरज फक्त सांगीतिक नव्हती तर साहित्यिकपण! कारण नवकवितेचा उदय याच काळांतला व ती कळत नाही असा मुख्य आक्षेप होता. दुसरीकडे 'निधर्मी' शासन आणि विधिवैकल्ये रोडावल्यामुळे भक्तिसंगीताशी प्रत्यक्ष व रोजचा संबंध रोडावलेला... गजल व भक्तिसंगीत यांची पार्श्वभूमी ही अशी आहे. चाल हवी पण गुणगुणता येईल वाटण्याइतकी सुलभ, अर्थ हवा पण तोही काव्यपरतेचे झिरझिरीत आवरण घेतलेला! जनमानसाच्या या मागण्या पुऱ्या करणारे दोन प्रकार एकमेकांच्या आसपास परिणामकारक ठरावेत हा काही योगायोग नाही. मराठी मुलुखापुरते पाहिले तर भावगीतांच्या जमान्यानंतर गजलांची राजवट सुरू झाली हेही नोंदण्यासारखे आहे. भावगीते गाणाऱ्यांच्या नंतरच्या पिढीतले लोक गजलगायनाकडे वळत आहेत हेही क्रमप्राप्त म्हटले पाहिजे.

आता महानगर संस्कृती आणि पंचतारांकित विश्रामस्थानांच्या आश्रयाबाबत थोडेसे.

मोठमोठ्या बहुराष्ट्रीय कंपन्यांचे अधिकारी, फिरते प्रतिनिधी, शिष्टमंडळे, आपल्याच देशांतले पण आपल्या संस्कृतीत न वाढलेले... यांना ज्या प्रकारची कला आणि कारागिरी पचेल व रुचेल त्यांत गजल नीटपणे बसत नाही काय? योगापासून मुजरा- नृत्यापर्यंत आणि दागिन्यांपासून संस्कृतीपर्यंत सर्वांना आज पंचतारांकित व्यासपीठे लागतात आणि लाभतात! याशिवाय सहजपणे आपल्याभोवती फिरवता येणारे - म्हणजे दाठर लक्षणे नसणारे, जाहिरातदार वगैरेंना उपलब्ध संगीतप्रकार कोणते? ऐष - आराम, विलास यांसाठी आवाहन करणाऱ्या व्यवसायांनी मनमोकळेपणे गजलासाठी पैसा ओतला आहे ही सहज समजणारी गोष्ट आहे.

***: हे जरा जास्तच होत नाही काय? तुमच्या विवेचनातून गजल हा उपटसुंभ आणि संधिसाधू प्रकार आहे असे भासू लागले आहे!***

गजलाच्या आजच्या लोकप्रियतेची कारणे जरा ओशाळवाणी वाटतात हे दुर्दैवाने खरे आहे. पण एकंदर या प्रकाराविषयी मला अनादर वाटत नाही. असो.

गजलच्या संगीत परंपरेकडे पाहा.

फारसी छंद व प्रेमगीत अशा वंशावळीचा गजल भारतीय मातीत काव्य म्हणून रुजावा यात नवल नाही. याच कारणाने त्याचे पठण होऊ लागले. काव्याचा आशय आणि बांधणीतले विशेष ठोसपणे प्रत्ययास यावेत, आविष्कार अगदीच गद्य वाटू नये इतपत चाल असावी

या पुरता गजल आणि संगीत यांचा संबंध रहावा अशी खबरदारी या अवस्थेत घेतली जाई. सुप्रसिद्ध आणि संपन्न मुशायरा परंपरा या संदर्भात सहजपणे ध्यानात येईल. (तरन्नुम म्हणजे वरची अवस्था होय.)

यापुढचे पाऊल टाकले की गजलला 'म्हणण्या'सारखी चाल आणि छंदोबद्धतेत अनुस्यूत असलेली तालपरता साक्षात लाभते. केवळ पठण असते तेव्हा लय असते, पण ताल नसतो. पठणात एक तर प्रत्येक चरण हळू वा जलद म्हणता येतो. चरणांतली अक्षरे एकमेकांच्या किती जवळ वा लांब असावीत हे म्हणणाऱ्याच्या हाती नसते पण त्या अक्षरांना किती कालावधी लागावा यात म्हणणाऱ्याचे तारतम्य चालते. आणि दुसरे म्हणजे एक चरण संपल्यावर दुसरा काही आपोआप सुरू होत नसतो. म्हणजे असे की छंद कायम राखून पहिल्या चरणाचे संपणे आणि दुसऱ्याचे सुरू होणे यांच्या दरम्यान सुखेनैव झोप काढली तरीही चरणांची (आतली) लय अबाधित राहते! सताल गायनात ही दोन्ही स्वातंत्र्ये उपलब्ध नसतात, गजलाला ताल आला की त्याची गीतावताराकडची वाटचाल अधिक दमदार पावलांनी सुरू होते. वाटचालीच्या आरंभीच्या काळात तालाच्या आकृतीस चिकटून चालण्याची गजलाची प्रवृत्ती असते.

**: *अवस्थांचे विवेचन काही उदाहरणांतून...***

सर्व अवस्थांचे वर्णन झाले की उदाहरणे देतो. गायनामुळे संगीताबरोबर नवीन समीकरणे जमविणे गजलाला शक्य होते. छंद आणि ताल यांना चिकटून न राहता त्यांची पकड ढिली करणे क्रमप्राप्त ठरते. मधेमधे छोट्या ताना, हरकती घेणे, शब्दांना सुरांनी सजविणे इत्यादी मार्गांनी गीतत्त्वाचे गुण वाढत्या प्रमाणात डोकावू लागतात. परंतु याही अवस्थेत गायनाची एकंदर लय द्रुत राहिलेली दिसते. मूळ वृत्ताची गती तशी असते म्हणून असेल कदाचित. तेव्हा एकंदर गायनगती संथ करणे ही पुढची पायरी झाली. असे केल्यामुळे आलाप करायला अवसर मिळतो, शब्द सजवायला वाव राहतो, अधिक वा अधिक प्रकारची वाद्ये घेऊन स्वनरंगाची लयलूट संभवनीय होते. गजलाचे गायनात रूपांतर होते ते या अवस्थेत. उपशास्त्रीय वा सुगम असे ज्या गायनप्रकारांचे वर्णन केले जाते त्या ठुमरी वगैरेंच्या जवळ जाऊन गजल पोचतो तो असा. आज गायला जाणारा गजल बहुतांशी प्रस्तुत अवस्थेच्या आसपास आहे म्हटल्यास वावगे होणार नाही.

***: क्षणभर थांबा...संगीताशी हातमिळवणी करत करत गजलाची ठुमरी होणे पटण्यासारखे आहे. पण त्याचा तुम्ही काढलेला आलेख इतका ठाम व तर्कनिष्ठ वाटतो की एक प्रकारची सांगीतिक अस्वस्थता जाणवू लागते!***

: कृपया धीर धरा! विवेचनाच्या सोयीसाठी मी गजल ते ठुमरीनुमा गजल हा प्रवास वर्णन केला. पण तोच एकुलता एक उत्क्रांतिमार्ग असे सूचितही केलेले नाही! गजल ते गीत हा दुसरा एक प्रवासही शक्य असतो. गीतावस्थेत स्वर आणि शब्द यांचे प्रवाह समांतर वाहू लागतात. दोन्ही पक्षी बांधणी अधिक सहेतुक, रेखीव आणि परिणामोद्देशी होऊ लागते. वाद्यवृंदाची 'रचना' होते. हवी तेव्हा आलापी करणे वा इच्छेनुसार शब्द सजविणे, मनात येईल त्याप्रमाणे 'शेर' आयात करणे इत्यादी स्वातंत्र्याचा लोप होतो.

सर्व घडामोडीत काव्याला बाजूला सारले जात आहेसे वाटू लागले तर तक्रार कशी करावी? मग आणखी एक अवतार सिद्ध होतो. संगीतपठण असे नाव द्यावे त्याला हवे तर! ताल व तालवाद्येही नकोत पण स्वनरंग पैदा करणारी वाद्ये हवीत, चाल असावी पण गायन नसावे असे त्याचे स्वरूप असते. आतापर्यंत ज्या अवस्थांचे वर्णन केले त्यांचे एकेक उदाहरण देऊन पुढे चलतो.

१) छंदाला चिकटून, तालाला धरून पण पठणापलीकडे जाणे. 'दो फूल साथ खिले हैं' आणि 'किस्मत जुदा जुदा है' - मा. मनहर बर्वे

२) गजलाच्या गायनासाठी ताल, सुरावट यांच्याशी खेळणे. 'एक सितम और लाख अदाएँ' - बरकत अली

३) गायनाला वाव मिळावा म्हणून लय खेचणे व ठुमरीसारखे गाणे. 'दिले नादान तुझे हुआ क्या है' - मेहंदी हसन

४) शब्द व स्वर समांतर, वाद्यवृंदाचा आखीव सहभाग. 'ना रवाँ कहिए' - फरिदा खानुम

५) वातावरण बनविणारी सुरावट व वाद्ये असावीत पण ताल व गायन नको. 'यह नूर कैसा है' आणि 'यूं तेरी गुजर से रह दीवानावार गुजरे' - मीनाकुमारी

अर्थात गोष्ट इथे संपली नाही. संगीत आणि गजल यांच्या संसाराचे आणि एक प्रयोगपर्व आहे. हिंदुस्थानी गायनपद्धतीत ग्वाल्हेर घराण्यात गजल-गायनाची आणखी एक परंपरा आहे, यानुसार गजलाचे गायन टप्पा या संगीतप्रकाराच्या अंगाने होई. उंटाचे काफिले घेऊन फिरणाऱ्यांच्या गीतापासून टप्पा उत्क्रांत झाला अशी परंपरा आहे. म्हणजे असे की काव्यप्रकार आणि पठणशैली यांच्या पलीकडे जाण्याचा बेत पक्का होताच गजलाने उपलब्ध संगीतप्रकारांचा संच धुंडाळणे नैसर्गिक होते. मग पहिल्यापासूनच गजलने ठुमरी-मार्ग का स्वीकारला नाही? ताना, खटके, चमकदारपणा, द्रुत लय इत्यादी गुण प्रमुख असलेल्या टप्प्याकडे तो का वळला? याचे उत्तर प्रयोगपरंपरेच्या छाननीतूनच मिळेल. भावपूर्णता, उत्कटता, परिणामकारकता यांना द्रुत लय, ताना, सामूहिकता यांसारख्या बाबी विरोधी नसतात अशी प्रयोगपरंपरेची धारणा आहे. (कव्वालीचे उदाहरण सहज आठवावे.) शिवाय ठुमरीचे नृत्याशी आणि नर्तनाचे स्त्रियांशी असलेले साहचर्य ध्यानात घ्यायला हवे. परंपरा नीट अनुभवल्यास गजलाची टप्प्याबरोबरची मिळवणी तितकीच दिलखेचक वाटेल. पुढच्या काळात टप्प्याशी काडीमोड घेऊन ठुमरी, गीत इ.शी पाट लावण्याचे स्वातंत्र्य का घेतले याची कारणे केवळ सांगीतिक नाहीत. त्याचा ऊहापोह पूर्वी केलाच आहे.

***: गजलाच्या आजच्या गायकीचा आणि त्याच्या रचनाविशेषांचा संबंध कसा आहे?***

: हा संबंध बराच जवळचा आहे. उदाहरणादाखल पुढील तपशील पाहा.

गजलचा छंद (बेहेर) नीट पाहावा. त्यांच्या ओळी फार दीर्घ नसतात वा ऱ्हस्वही. रूपक वा दादरा वा केरवा या अनुक्रमे सात व सहा व आठ मात्रांच्या तालात गाण्यासाठी गजलचे चरण सोयीचे. खरे म्हणजे परस्परसोयीचे. मुख्य कारण असे की तिन्ही ताल कमी मात्रांचे असल्याकारणाने आवर्तन सुटले तरी चालू शकते, दुसरे आवर्तन वळणावरच असते. शिवाय ऐकणाऱ्यालाही मान डोलावण्यात चूक झाली तरी घोडचूक झाली असे वाटत नाही!

रदीफ आणि काफिया म्हणजे अनुक्रमे अन्त्य व उपान्त्य यमके. व तेच शब्दही. तेच वा तसेच शब्द पण चाल मात्र निराळी असे होताच चाल ठसते.

शेर म्हणजेच द्विपदीच. द्विपदींना सैलपणे एकत्र आणून गजल पूर्ण होतो. खरे पाहता अर्थाच्या अनेक छटा गुंफण्याच्या दृष्टीने शेर हे छोटे व स्वयंपूर्ण एकक फार सोयीचे आहे. संगीतप्रकाराच्या आकाशरेषा कमी दाठर करण्यात काव्यप्रकाराच्या काहीशा सैल रचनेचा मोठा सहभाग आहे.गजलाच्या गायनातही मूळ रचनेत नसलेल्या इतर व इतरांच्या शेरांचे गायन तालचौकटीस 'टाइम आउट' देऊन होत असते. म्हणजे साहित्य व संगीत या दोन्ही अंगांबाबत गजलगायनात अधिक स्वातंत्र्य घेतले जाते व घेता येते.

मतला म्हणजे पहिला शेर. वारंवार येणाऱ्या शास्त्रोक्त संगीतातील बंदिशीच्या मुखड्याचे कार्य तो पार पाडतो असे म्हणण्यास हरकत नाही. दोन ओळी, त्यातही यमके वगैरे असे स्वरूप आणि आशयाचे केंद्र बनण्याची क्षमता अशी गुणवत्ता. श्रोत्यांना मतला सहजपणे आपलासा होतो याचे नवल वाटायला नको.

मक्ता हा शेवटचा शेर. गजलांतील तुका म्हणे! म्हणजे रचनाकर्त्याचे नाव गुंफलेला.

उल्लेख केलेल्या रचना-विशेषांत अंगभूत गायनानुकूलता आहे. शिवाय गजलच्या सादरीकरणात कोण, काय याची ओळख परेड पटविण्याचा प्रघात आहे. मुशायऱ्यांतला हा वाणगुण म्हणावा हवा तर. मतला है, मक्ता सुनिये, खुबी देखिये, शेर अर्ज है... इत्यादी वाक्यांशांची पखरण गझलगायनात गायकाकडून होत असते. यामुळे श्रोत्यांचे अवधान राहते. शिवाय सादप्रतिसाद दोन्ही संकेतबद्ध असल्याकारणाने कलाकार व श्रोता यांची देवाण-घेवाण होते.

आजकाल गजलगायक निरनिराळे शास्त्रोक्त राग, तिहाई, सरगम यासारखे आविष्कारमार्ग धुंडाळतात. यात चूक काही नाही. गजल म्हणजे भावकविता, हळवेपणा आर्तता यांसारख्या समीकरणांना छेद देणारे हे विशेष होत. आपली कारागिरी दाखविणे वा आपण शास्त्रोक्तवाल्यांपेक्षा कमी नाही, अशा ओशाळपणातून तिकडे वळणे हे अवगुण तेवढे नसावेत. बाकी हरकत काय? सर्व गायनप्रकार एकमेकांत देवाण-घेवाण करत असतातच! मर्यादा पाळता आल्या तर रूप सिद्ध होते. गायनात गोष्टी करून पाहिल्यावरच जमल्या न जमल्याची जाणीव होते! तेव्हा गजल खूप गायला जात आहे आणि अनेक प्रकारांनी याचे स्वागत आहे. पण सादरीकरणातली चतुराई, अ-सांगीतिक बाबींकडून मिळालेला फायदा, माध्यमांच्या शक्तीमुळे होणारा 'सुपर' प्रसार यामुळे फसून जाऊन संगीतप्रकाराच्या अंगभूत ताकदीविषयी व स्वतःविषयी खोटे समज बाळगू नयेत. माध्यमाच्या ताकदीमुळे सर्व उपपत्त्या आज भांबावल्या आहेत आणि समीक्षक गोंधळले आहेत! पण म्हणून मानदंडांविषयी वा गुणवत्तेविषयी मूलभूत विचार करण्यात खंड पडता कामा नये.

---